प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 2266 0358

३१ मे, २०१३

**वित्तीय संस्थांमध्ये पैसे जमा करताना चैाकशी करा : आरबीआयचा सल्ला**

भारतीय रिझर्व बँकेने आज सर्व जनतेला सल्ला दिला आहे की, त्यांनी एनबीएफसींमध्ये करावयाच्या गुंतवणुकींसह, ते करु इच्छित असलेल्या गुंतवणुकींबाबत त्यांनी काळजीपूर्वक मूल्यांकन करावे, आणि हा सल्ला, केंद्रीय बँकेद्वारा दिल्या गेलेल्या नेहमी विचारल्या जाणा-या प्रश्नांचाच (एफ ए क्यु) एक भाग आहे. ह्या एफएक्युंमध्ये, निरनिराळ्या प्रकारच्या वित्तीय संस्था व त्यांना नियंत्रित करणारे विनियम ह्यांचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. ह्यामध्ये, एखादी वित्तीय संस्था अनधिकृत रितीने व्यवसाय करत असल्याचे दिसून आल्यास किंवा ठेवी परत करत नसल्यास, जनतेने कोठे तक्रार दाखल करावी ह्या बाबतचीही माहिती दिली आहे.

उदाहरणादाखल, ह्या एफएक्युंमध्ये देण्यात आलेले आहे की, आपला मुख्य व्यवसाय म्हणून वित्तीय कार्यकृती करणा-या अबँकीय वित्तीय कंपन्यांचे नियंत्रण रिझर्व बँकच करते, आरबीआयद्वारे केवळ थोडक्याच अबँकीय वित्तीय कंपन्यांना ठेवी स्वीकारण्यास प्राधिकृत करण्यात आले आहे आणि इन्कॉर्पोरेट झालेल्या सर्व संस्थांनी, भारतीय रिझर्व बँक १९३४ खाली किंवा कंपनी अधिनियम १९५६ खाली, ठेवी स्वीकारण्याबाबत, प्राधिकृतता घेणे अत्यावश्यक आहे व रिझर्व बँक, चिट फंड किंवा सामुदायिक गुंतवणुकींच्या योजना (सी आय एस) नियंत्रित करत नाही.

ह्या एफएक्युंद्वारे असेही सांगण्यात आले आहे की, ठेवी स्वीकारण्यासाठी आरबीआयने प्राधिकृत केलेल्या एनबीएफसींची यादी आरबीआयच्या वेबसाईटवर *(www.rbi.org.in → Sitemap → NBFC List → List of NBFCs Permitted to Accept Deposits)* उपलब्ध असून जनतेला सांगण्यात येते की त्यांनी अबँकीय वित्तीय संस्थांमध्ये ठेवी ठेवण्यापूर्वी ह्या यादीचा संदर्भ घ्यावा.

रिझर्व बँकेने ह्यापूर्वीही अनेकदा, वृत्तपत्र निवेदनांद्वारे व तिच्या प्रादेशिक कार्यालयांनी केलेल्या जनजागृती कार्यक्रमांद्वारेही, सर्व साधारण जनतेला सावधानतेचा इशारा दिला आहे की, त्यांनी, व्यक्ती, इनकॉर्पोरेट न झालेल्या संस्था व कंपन्या ह्यांनी दिलेल्या अवास्तव परताव्यांच्या खोट्या आाासनांना बळी पडू नये.

आरबीआयच्या एफएक्युंमध्ये हेही सांगण्यात आले आहे की, एखादी कंपनी अनधिकृतरीत्या ठेवी स्वीकारताना आढळल्यास किंवा मुद्दल आणि/किंवा व्याज परत देत नसल्यास, जनतेने स्थानिक पोलिसांकडे किंवा राज्य पोलिसांच्या इकॉनॉमिक ऑफेन्सेस विंगकडे, ताबडतोब तक्रार नोंदवावी. आणि ती संस्था एखादी कंपनी असल्यास रजिस्ट्रार ऑफ कंपनीजकडे तक्रार नोंदवावी.

**एनबीएफसींकडे ठेवी ठेवताना कोणती* चैाकशी करावी ह्याबाबत आरबीआयचा सल्ला.**

एखाद्या एनबीएफसीमध्ये ठेव ठेवण्यास इच्छुक असलेल्या गुंतवणुकद्वाराने पुढील खात्री करुन घ्यावी : ती एनबीएफसी आरबीआयकडे पंजीकृत झाली असून ठेवी स्वीकारण्याबाबत तिला खास प्राधिकृतता देण्यात आली आहे. आरबीआयच्या वेबसाईटवरील (www.rbi.org.in → Sitemap → NBFC List) यादीवरुन हे तपासता येऊ शकते. सार्वजनिक ठेवी स्वीकारण्यास परवानगी असलेल्या एनबीएफसींची यादी ठेवीदाराने तपासावी व त्याचबरोबर ही देखील तपासणी करावी की त्या कंपनीचे नाव, ठेवी स्वीकारण्याबाबत मनाई केलेल्या कंपन्यांच्या यादीत नाही.

रिझर्व बँकेने दिलेले पंजीकरण प्रमाणपत्र (सी ओ आर) आपल्या साईटवर ठळकपणे प्रदर्शित करणे एनबीएफसींना आवश्यक आहे. एखादी एनबीएफसी, सार्वजनिक ठेवी स्वीकारण्यासाठी प्राधिकृत असल्यास, त्या बाबतच्या प्रमाणपत्रात पुढील बाबी दिसून येतात.

एनबीएफसींनी स्वीकारलेल्या ठेवींच्या पुनर्प्रदानाबाबत आरबीआय हमी देत नाही. एनबीएफसी, त्यांचा व्यवसाय करीत असताना, कोणत्याही प्रकाराने आरबीआयचे नाव वापरु शकणार नाहीत.

सध्या, एखाद्या एनबीएफसीद्वारे गुंतवणुकदाराला दिला जाणारा कमाल व्याजदर १२.५% पेक्षा अधिक असणार नाही. तथापि मॅक्रो-इकॉनॉमिक परिस्थितीवर अवलंबून, रिझर्व बँक हे व्याजदर बदलत असते. व्याजदरांमधील बदल, रिझर्व बँक तिच्या वेबसाईटवर (rbi.org.in → Sitemap → NBFC List → FAQs. ) प्रसिध्द करत असते.

एखाद्या कंपनीमध्ये ठेवलेल्या ठेवीच्या प्रत्येक रकमेबाबत पावती मिळण्याचा आग्रह गुंतवणुकदाराने धरलाच पाहिजे. अशा पावतीवर त्या कंपनीने प्राधिकृत केलेल्या अधिका-याची सही असून त्याचबरोबर ठेव ठेवल्याची तारीख, गुंतवणुक दाराचे नाव, अक्षरात व अंकात ठेवीची रक्कम, देय असलेला व्याजदर, परिपक्वतेची तारीख व रक्कम ह्यांचाही निर्देश असावा.

मार्केटमधील इतरांनी देऊ केलेल्या व्याजदरापेक्षा, गुंतवणुकीवर दिला जाणारा व्याजदर किंवा परताव्याचा दर अधिक असा देऊ केला गेल्यास गुंतवणुकदारांनी सावधपणा ठेवावा. निधी स्वीकारणारी संस्था, तिने वचन दिलेल्या निधीपेक्षा अधिक मिळविण्यास सक्षम नसल्यास, ती संस्था तिच्या वचनानुसार गुंतवणुकदाराला पुनर्वदान करु शकणार नाही. अधिकतर उत्पन्न मिळविण्यासाठी, त्या संस्थेने केलेल्या गुंतवणुकींवर तिला उच्चतर जोखीम घ्यावी लागेल. अधिकतर जोखीम म्हणजे सट्टेबाजीच्या कार्यकृती कराव्या लागणे आणि अशा कार्यकृतींवर कोणताही खात्रीलायक परतावा असू शकत नाही. त्यामुळे, जनतेने स्वतःलाच सावधान करावे की, अधिकतर व्याजदर देणा-या योजनांमध्ये पैसे गमावण्याचा संभवही अधिक असतो. आणि तरीही त्यांना अधिकतर परतावा-दर देणा-या योजनांमध्ये गुंतवणुक करावयाची असल्यास, गुंतवणुकदारांनी खात्री करुन घेणे आवश्यक आहे की, असा अधिकतर परतावा देणारी संस्था, एखाद्या वित्तीय क्षेत्र विनियामकाकडे पंजीकृत झालेली आहे आणि ठेवी किंवा अन्य स्वरुपात निधी स्वीकारण्यास प्राधिकृत आहे.

* ही यादी केवळ उदाहरणादाखल आहे परिपूर्ण नाही.

वृत्तपत्रासाठी निवेदन २०१२-२०१३/२०१६

**आर आर सिन्हा**
उप महाव्यवस्थापक

| संबंधित एफएक्यु | |
|---|---|
| मे ३१, २०१३ | तुम्हाला जाणून घ्यावयाची सर्व माहिती- एनबीएफसी संबंधाने |